शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण कार्यान्वित करण्याबाबतच्या कार्यपध्दतीबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: संकीर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १९ डिसेंबर, २०१८

**पहावे :-** १) शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-१०१७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दिनांक- १६ मार्च, १९९९.
२) शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ , दिनांक- १३ ऑगस्ट, २०१४.

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-१०१७/ प्र.क्र.३१/ ९८/१६-अ, दिनांक १६ मार्च, १९९९ नुसार शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती करतांना समांतर आरक्षण कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती विहीत करण्यात आली होती. तद्नंतर उक्त संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि.१३ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शनार्थ स्पष्टीकरणात्मक सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि दि.१३.०८.२०१४ रोजीच्या परिपत्रकाविरुध्द विविध न्यायालयात प्रकरणे उदभवली आहेत. काही प्रकरणी दि.१३.०८.२०१४ रोजीच्या परिपत्रकाच्या बाजूने तर बहुतेक प्रकरणी परिपत्रक सर्वोच्च न्यायालयाच्या अनिलकुमार गुप्ता, राजेशकुमार दारिया व रविंदर कुमार दिलेल्या निर्णयाशी सुसंगत नसल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

२. मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्र.१९२५/२०१४, १९३०/२०१४, २०७०/२०१७, ५७२९/२०१७, ६२६२/२०१६, मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी याचिका क्र.३९२९/२०१५, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.६६३७/२०१४, २७७/२०१५, ७०३४/२०१६ या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने खुला समांतर आरक्षणाच्या पदावर राखीव प्रवर्गातील उमेदवारांचा समावेश करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई मूळ याचिका क्र.२०२/२०१७, २०३/२०१७ (M.A.१९/२०१८) या प्रकरणी दि.१३.८.२०१४चे शासन परिपत्रक दि. १६/०८/२०१८ रोजी रद्दबातल ठरविलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.१३.०८.२०१४ रोजीच्या परिपत्रकातील सूचनांनुसार उमेदवारांच्या शिफारशी केल्या जात असल्याने मा. न्यायालयात अनेक याचिका दाखल होत आहेत त्यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोग व इतर निवडमंडळांना उमेदवारांच्या शिफारशी करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्याचप्रमाणे शासनाकडून विशेष भरती मोहिम राबविली जाणार असल्याने विविध संवर्गातील हजारो पदे भरण्यात येणार आहेत. समांतर आरक्षण धोरणाच्या बाबतीत स्पष्टता नसल्याने मोठ्या प्रमाणात न्यायालयीन प्रकरणे उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे भरती प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यात अनेक अडचणी निर्माण होतील. सबब मा.महाधिवक्ता यांनी दिलेले अभिप्राय व मा.न्यायालयाचे याबाबतचे निर्णय विचारात घेता दि.१३.०८.२०१४ रोजीच्या परिपत्रकात सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

**शासन शुध्दीपत्रक :-**

शासन परिपत्रक क्रमांक- एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ , दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ मधील परिच्छेद "(अ) - प्रथम टप्पा :- खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाची पदे भरतांना, गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी (या ठिकाणी खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश होईल). या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर खुल्या प्रवर्गासाठी राखीव समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरीता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून समांतर आरक्षणास पात्र उमेदवारांपैकी केवळ खुल्या प्रवर्गाचेच आवश्यक पर्याप्त संख्येइतके उमेदवार घेणे आवश्यक आहे."

**या ऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे**

**"(अ) - प्रथम टप्पा:- खुल्या प्रवर्गातील (अराखीव पदे) उमेदवारांची गुणवत्तेच्या निकषानुसार निवड यादी तयार करावी. या यादीत खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा.भ.ज., वि.मा.प्र., इ.मा.व. व एसईबीसी) समावेश होईल. या यादीत समांतर आरक्षणानुसार उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरीता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारांपैकी आवश्यक पर्याप्त संख्येइतके समांतर आरक्षणामधील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवार घेणे आवश्यक आहे."**

हे शासन शुध्दीपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८१२१९१६५१४१६४०७ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( शिवाजी दौंड )**
सचिव (साविस), महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३) मा.राज्यपालांचे सचिव, मलबार हिल, राजभवन, मुंबई-४०० ०३५.
४) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)

५) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
६) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
७) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव.
८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
१०) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई-४०० ०३२.
११) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१२) सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई-४०० ०३२.
१३) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१५) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१६) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
१९) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-१, मुंबई.
२०) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र-२, नागपूर.
२१) सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद,नागपूर.
२२) सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद,नागपूर.
२३) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती) त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.
२४) ग्रंथपाल, विधीमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२५) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका.
२७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
२८) राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.
२९) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
३०) निवड नस्ती/कार्यासन १६-अ.



More Download and guidance @ www.omkarshendure.com (AEE)